जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 AUG 2026
तरुण भारत




**कोल्हापूर :** विद्यापीठात बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

# शिवाजी विद्यापीठात बॅ. बाळासाहेब खर्डेकर जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रात बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रात कुलगुरू डॉ. राजनीश कामत, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. एस. जी. घाणे, संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. सचिन पाटील, डॉ. शिवराज थोरात, अनिल मातेकर, संध्याराणी पाटील, वंदना गुरव, आनंदा अवघडे, आदी उपस्थित होते.

03 AUG 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




# शिवाजी विद्यापीठामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये शनिवारी सकाळी कुलगुरू डॉ. रजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. एस. जी. घाणे, अध्यासनाचे समन्वयक डॉ. ए. एम. सरवदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. आर. जी. बारवेकर, डॉ. एम. एस. वासवाणी, डॉ. धनंजय सुतार, डॉ. मच्छिंद्र गोफणे, उपकुलसचिव डॉ. विभा अंत्रेडी, डॉ. उत्तम सकट, डॉ. नीलेश बनसोडे, सुरेश बंडगर, सुरेखा आडके, अनिल साळोखे, अरविंद पाटील, बाबुराव तिळणे यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशासकीय सेवक, अधिकारी आणि शिक्षक उपस्थित होते.

दरम्यान, विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रुपाली संकपाळ, डॉ. विद्यानंद खंडागळे, रत्नदीप पाटील, रुचिता थरोली, सना शेख, प्रवीण मोरे, शुभम गायकवाड यांच्यासह अधिविभागातील प्राध्यापक, शिक्षक, संशोधक विद्यार्थी, एम.एड., बी.एड., एम.एड. एकात्मिक आणि बी. एस्सी. बी. एड. (आयटीईपी) चे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 AUG 2026
लोकमत



# निवृत्त ग्रुप कॅप्टन श्रीकांत वालवडकर यांना पीएच.डी

कोल्हापूर : भारतीय हवाई दलातील निवृत्त ग्रुप कॅप्टन श्रीकांत बाळकृष्णराव वालवडकर यांनी शिवाजी विद्यापीठातून इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली. शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. मिळविणारे ते पहिले माजी हवाई योद्धा ठरले आहेत. विद्यापीठाने ऑक्टोबर २०२४ मध्ये भारतीय हवाई दलासोबत सामंजस्य करार केला आहे. यानुसार, सेवेतील इच्छुक हवाई योद्ध्यांना उच्च शिक्षणासाठी आवश्यक सुविधा दिल्या जात आहेत. याचा लाभ घेत वालवडकर यांनी 'इंडियन मिलिटरी ऑपरेशन्स-परसेप्शन अँड प्रेझेंटेशन इन सिलेक्टेड वॉर नॉन-फिक्शन्स अँड वॉर मूव्हीज' या विषयावर संशोधन केले. त्यांना डॉ.तृप्ती करेकट्टी यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 AUG 2026
लोकमत

# लेखन प्रेरणा दिन' शासनमान्य; विद्यापीठात आनंदोत्सव

**कोल्हापूर :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १ ऑगस्ट या जन्मदिनाचा राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने जाहीर केल्यानंतर शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी दंगलकार कवी नितीन चंदनशिवे, डॉ. डी. वाय. जमादार, डॉ. कपिल राजहंस, सेवानिवृत्त सीमाशुल्क अधिकारी मदन पवार, प्रकाशिका डॉ. शोभा चाळके, अनिल म्हमाने, अंतिमा कोल्हापूरकर, डॉ. वसंत भागवत उपस्थित होते.

0 3 AUG 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भगवान महावीर अध्यासन केंद्र सुसज्ज करणार

## पालकमंत्री आबिटकर; जैन समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी महायुती सरकार कटिबद्ध

- समाजाच्या भविष्यासाठी दक्षिण भारत जैन सभेचे योगदान महत्त्वपूर्ण




**कोल्हापूर : दक्षिण भारत जैन सभेच्या अधिवेशनात बोलताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर. व्यासपीठावर आ. राजेंद्र पाटील, आ. राहुल आवाडे, प्रकाश आवाडे, समित कदम, वीरकुमार पाटील आदी.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात भगवान महावीर अध्यासन केंद्र उभारणीची पायाभरणी नुकतीच झाली. समाजाच्या उद्धारासाठी केंद्राची सुसज्ज इमारत उभारणार. तसेच जैन समाजाचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी महायुती सरकार कटिबद्ध असल्याचे आश्वासन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. समाजाच्या भविष्यासाठी दक्षिण भारत जैन सभेचे योगदान महत्त्वपूर्ण असणार आहे, असेही आबिटकर यांनी नमूद केले.

दक्षिण भारत जैन सभेचे १०४ वे नैमित्तिक अधिवेशन रविवारी महासैनिक दरबार हॉल येथे मोठ्या उत्साहात झाले. यावेळी ते बोलत होते. अधिवेशनाचे उद्घाटन खासदार शाहू महाराज यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष भालचंद्र पाटील होते. यावेळी स्मरणिका, प्रगती आणि जिनविजय डिजिटल अंकाचे प्रकाशन, जैन सभेच्या सॉफ्टवेअरचे अनावरन मान्यवरांच्या हस्ते झाले.

यावेळी आ. राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी कागल तालुक्यात जैन समाजाची जमीन आहे. ती विकसित करण्यासाठी निधी द्यावा, अशी विनंती मंत्री हसन मुश्रीफ यांना केली. मंत्री मुश्रीफ यांनी संबंधित जागा व बाचणी येथील समाजाच्या मंदिर जीर्णोद्धारासाठी निधी देण्याचे आश्वासन दिले. यावर माजी आमदार प्रकाश आवाडे यांनी ही जागा सुशिला सदलगे यांनी समाजाला दिली आहे. येथील इमारतीला त्यांचे नाव देण्याची सूचना केली.

आमदार सतेज पाटील म्हणाले, जैन समाज आणि शेतकरी संघ यांच्यामधील लक्ष्मीपुरी येथील जागेवरून सुरू असलेल्या वादात योग्य मार्ग काढू.

यावेळी बेळगावचे माजी आमदार संजय पाटील, वीरकुमार पाटील, जनसुराज्यचे समीत कदम, उत्तम पाटील, संजय शेटे, रवींद्र माणगावे आदी उपस्थित होते.

### जैन समाजाच्या दोन मंदिरांसाठी आणखी निधीची गरज

इचलकरंजी आणि हातकणंगले येथे असणाऱ्या जैन समाजाच्या दोन मंदिरांना पालकमंत्री आबिटकर यांनी १८ कोटींचा निधी मंजूर केला; मात्र या मंदिरांच्या विकासासाठी आणखी ३० कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे. पालकमंत्री आबिटकर यांनी या निधीसाठी शासनाकडे पाठपुरावा करावा, असे आमदार राहुल आवाडे म्हणाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 AUG 2026
तरूण भारत



कोल्हापूर : बी. ए. भाग ३ च्या अभ्यासक्रमासाठी तयार केलेल्या पुस्तकांचे प्रकाशन करताना कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत, प्र–कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. चंद्रवर्धन नाईक, डॉ. अवनीश पाटील, डॉ. कृष्णा पाटील.

# 'बी. ए. भाग ३'च्या १६ पुस्तकांचे प्रकाशन

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाकडून बी.ए.भाग तीनच्या अभ्यासक्रमासाठी तयार केलेली पाच दूरस्थ अभ्यासक्रमाची आणि ११ क्रमिक अभ्यासक्रमाची अशी एकूण १६ पुस्तके प्रकाशित करण्यात आली. या पुस्तकांचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. कामत म्हणाले की, प्रवेश प्रक्रिया सुरू असतानाच विद्यार्थ्यांना दूरस्थ आणि क्रमिक अभ्यासक्रमांची पुस्तके उपलब्ध करून देणे उल्लेखनीय आहे. वर्तमान समजण्यासाठी आणि भविष्याची दिशा निश्चित करण्यासाठी महत्वाचा विषय आहे. त्यामुळे इतिहासाच्या अभ्याससाहित्यात संदर्भग्रंथ, क्यूआर कोड, संबंधित संकेतस्थळे आणि इतर डिजिटल साधनांचा समावेश करून विद्यार्थ्यांना मूळ माहितीपर्यंत पोहोचण्याची संधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

यावेळी प्र–कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. चंद्रवर्धन नाईक, इतिहास अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. अवनीश पाटील, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, अभ्यास मंडळ विभागाच्या संध्या अडसुळे, दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव विनय शिंदे, दिलीप मोहाडीकर, दीपक काशिद, विविध पुस्तकांचे संपादक, लेखक आदी उपस्थित होते.

## प्रकाशित झालेली पुस्तके

▶प्रकाशित साहित्य बी. ए. भाग ३, सत्र ५ व ६ : इतिहास क्रमिक पुस्तके

▶स्थानिक इतिहास : संकल्पना आणि पद्धती, कोल्हापूरचा वारसा, आधुनिक जगाचा इतिहास, स्थानिक इतिहासाचे उपयोजन, मध्ययुगीन भारताचा इतिहास,

▶प्राचीन भारताचा इतिहास, इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह, इतिहासलेखनाची
तंत्रे यांसह एकूण ११ पुस्तके प्रकाशित करण्यात आली.

इतिहास दूरस्थ ▶अभ्यासक्रमाचे स्वयंअध्ययन साहित्य इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह, इतिहासलेखनाची तंत्रे, प्राचीन भारताचा इतिहास, आधुनिक जगाचा इतिहास, मध्ययुगीन भारताचा इतिहास आणि मराठा साम्राज्याचा उदय व दृढीकरण या विषयांची एकूण ५ पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 AUG 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठामध्ये बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती उत्साहात

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठामधील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रामध्ये बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती शनिवारी उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रामध्ये सकाळी कुलगुरू डॉ. रजनीश कामत आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. एस. जी. घाणे, संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. सचिन पाटील, डॉ. शिवराज थोरात, अनिल मातेकर, संध्याराणी पाटील, वंदना गुरव, आनंदा अवघडे, एस. एस. बुवाडवरी यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशासकीय सेवक, अधिकारी आणि शिक्षक उपस्थित होते.